जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली
दिनांक : 19/01/2011

# जाहीर प्रगटन
## जिल्हा सेतु समिती

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा - 2005 अंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या सुरळीत अंमलबजावणीसाठी हिंगोली जिल्हयामध्ये प्रत्येक तालुक्यासाठी एक (APO Co ordination) व जिल्हा मुख्यालयासाठी एक (APO Monitoring) या प्रमाणे एकूण **सहा सहाय्यक कार्यक्रम अधिकारी** यांची नियुक्ती कंत्राटी स्वरुपात जिल्हा सेतु समिती मार्फत करावयाची आहे. त्यासाठी पात्र व्यक्तींची नामनिर्देशने जिल्हा सेतु समिती मार्फत मागविण्यात येत आहेत. प्राप्त झालेल्या अर्जातुन उमेदवारांची निवड मुलाखतीद्वारे करण्यात येईल.

तसेच मग्रारोहयो अंतर्गत निधीच्या किमान 50 % रक्कमेची कामे ग्राम पंचायतीमार्फत करावयाची आहेत. ग्रामपंचायतींना तांत्रीक सहाय्य करण्यासाठी सक्षम अनुभवी **पॅनल तांत्रीक अधिकारी** यांची कंत्राटी स्वरुपात स्थापत्य अभियंत्यांकडून तसेच कृषी अभियांत्रीकी पदविका धारक , कृषी पदविधारक आणी वनक्षेत्रातील पदवीधारक यांचेकडुन जिल्हा सेतु समिती हिंगोली याद्वारे अर्ज मागवित आहे. प्राप्त झालेल्या अर्जातुन उमेदवारांची निवड मुलाखतीद्वारे करण्यात येईल.

**कंत्राटी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी पदासाठी पात्रता :-**

1) उमेदवार किमान MBA, MSW किंवा पदव्युत्तर पदवीधारक असावा, 2) उमेदवारास कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल. 3) उमेदवार MS-CIT उत्तीर्ण असावा त्यास संगणक हाताळणीचे/इंटरनेट हाताळणीचे पुरेसे ज्ञान असावे. 4) तो कुठल्याही राजकीय पक्षाशी संबंधीत नसावा.

**पॅनल तांत्रीक अधिकारी पदासाठी पात्रता :-**

1) उमेदवार हा स्थापत्य अभियांत्रीक पदविकाधारक/कृषी अभियांत्रीक पदविकाधारक/कृषी पदविधारक/ वन क्षेत्रातील पदवीधारक असावा.

2) उमेदवारास कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल. 3) उमेदवार MS-CIT उत्तीर्ण असावा त्यास संगणक हाताळणीचे/इंटरनेट हाताळणीचे पुरेसे ज्ञान असावे. 4) तो कुठल्याही राजकीय पक्षाशी संबंधीत नसावा.

**दोन्ही पदांसाठी कामाचा कालावधी :-** उमेदवाराचा कामाचा कालावधी 11 महिने राहील. काम समाधान कारक असल्यास पुढील कालावधीसाठी मुदतवाढ देता येईल. व काम असमाधानकारक असल्यास कोणत्याही वेळी उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीकारांनी राखुन ठेवले आहेत.

**कामाचे स्वरुप :-**

सहाय्यक कार्यक्रम अधिकारी आणी पॅनल तांत्रीक अधिकारी यांचे कामाचे स्वरुपाबाबत माहिती हिंगोली जिल्हयाची वेबसाईट www.hingoli.nic.in या वेबसाईटवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोलीचे रोहयो शाखेत पहावयास मिळेल.

**सहाय्यक कार्यक्रम अधिकारी पदासाठी उमेदवाराचे मानधन -**रु.10000 + रु.1000 (प्रवास व मोबाईल फोन खर्च) असे एकूण रु.11,000/- प्रतिमाह

**पॅनल तांत्रीक अधिकारी पदासाठी उमेदवाराचे मानधन** - रु.9000/- + रु.1000/-(प्रवास खर्च व मोबाईल फोन खर्चासाठी) असे एकुण रु.10,000/- मानधन देण्यात येईल.

**अर्ज सादर करण्याची पध्दती -** 1) अर्ज पांढ्या A-4 आकाराच्या कागदावर संगणीकृत करुन **अध्यक्ष, जिल्हा सेतु समिती, जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली** यांचे नावे सादर करावा लागेल. (अर्जामध्ये उमेदवाराचे नाव, उमेदवाराचा संपूर्ण पत्ता, संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक, शैक्षणीक पात्रता, ज्या तालुक्यात काम करण्यास इच्छुक आहेत त्या तालुक्याचे नाव, उमेदवाराचे वय, लिंग व कामाचे पुर्व अनुभवाचा तपशील इत्यादी बाबीचा समावेश असावा) 2) अर्जासोबत शैक्षणीक पात्रता व अनुभवाबाबतच्या कागदपत्रांच्या मुळ प्रती सोबत आणाव्यात व साक्षांकीत प्रती अर्जासोबत जोडाव्या लागतील याची नोंद घ्यावी.

**सहाय्यक कार्यक्रम अधिकारी पदासाठी अर्ज सादर करावयाचा दिनांक** - सहाय्यक कार्यक्रम अधिकारी पदासाठी अर्ज दिनांक 29/01/2011 रोजी सकाळी 10 ते 12 या कालावधीत सादर करावेत. त्याच दिवशी दुपारी पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील.

**पॅनल तांत्रीक अधिकारी पदासाठी अर्ज सादर करावयाचा दिनांक** - पॅनल तांत्रीक अधिकारी पदासाठी अर्ज दिनांक 31/01/2011 रोजी सकाळी 10 ते 12 या कालावधीत सादर करावेत. त्याच दिवशी दुपारी पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील. अपरीहार्य कारणास्तव मुलाखती नियोजीत दिवशी घेणे शक्य नसल्यास तशी सुचना उमेदवारांना अर्ज सादर करण्याचे दिवशी देण्यात येईल याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा सेतु समिती हिंगोली**

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा परिषदेला मनुष्यबळ (तांत्रिक पॅनेलसह) बाह्यस्थ पध्दतीने उपलब्ध करून देण्याच्या संदर्भात मार्गदर्शक सुचना**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२**

**शासन परिपत्रक, क्रमांक : मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र ७/रोहयो-१० अ**
**दिनांक : १६ डिसेंबर, २०१०**

**वाचा:-** १) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५ व त्याखालील मार्गदर्शक सुचना,
२) शासन निर्णय नियोजन विभाग क्र.मग्रारोहयो २००६/प्र.क्र.१०६/रोहयो-१० दिनांक १९/१०/२००६,
३) शासन निर्णय नियोजन विभाग, क्र. मग्रारोहयो २०१०/प्र.क्र.४८/रोहयो-१० दिनांक ०५/०६/२०१०

**शासन परिपत्रक :**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही केंद्र शासन पुरस्कृत योजना असून महाराष्ट्रातील ३३ जिल्हयांत राबविली जाते. केंद्र शासनाच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा, २००५ च्या कलम १६ (५) नुसार एकूण खर्च झालेल्या निधीपैकी किमान ५०% निधी ग्राम पंचायतीमार्फत करावयाच्या कामांवर खर्च होणे अनिवार्य आहे.

२. ग्रामपंचायतीची किमान खर्चाची मर्यादा लक्षात घेता, मगांराग्रारोह योजनेच्या अंमलबजावणीत ग्रामपंचायतीची भूमिका महत्वाची व राज्य रोहयोतील भूमिकेपेक्षा वेगळी आहे. राज्य रोहयोमध्ये सर्व कामे यंत्रणांमार्फत करण्यात येत होती, तर ग्रामपंचायतीचा सहभाग त्यात नव्हता. मात्र मगांराग्रारोहयोच्या अंमलबजावणीत ग्रामपंचायती महत्वपूर्ण भूमिका बजावत असून त्यांचेमार्फत सर्वसाधारणपणे २/३ कामे होत असून त्यांवर २/३ निधी खर्च होत असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर खर्च ५०% पेक्षा अधिक आहे.

३. जिल्हा परिषद/ग्रामपंचायतीमार्फत मगांराग्रारोहयोची अंमलबजावणी करताना त्यांना येणाऱ्या अडचणी शासनास कळवितात. शासन त्यांची दखल घेत असून, नुकताच उपरोक्त क्रमांक ३ च्या शासन निर्णयाव्दारे शासनाने ग्राम रोजगार सेवकांना मजूरी खर्चाच्या २.२५% मानधन देण्यात यावे, असा निर्णय घेतला आहे. या व्यतिरिक्त मगांराग्रारोहयोची अंमलबजावणी करणाऱ्या ग्रामपंचायतींना प्रशासकीय खर्च म्हणून ०.५% निधी देण्याचा निर्णय घेतला आहे.

४. ग्रामपंचायत व अन्य पंचायत राज संस्थांकडून शासनाकडे अशी निवेदने आली आहेत की, मगांराग्रारोहयोच्या अंमलबजावणीबाबतची जबाबदारी त्यांचेकडे देण्यात आली असली, तरी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेले तांत्रिक व इतर मनुष्यबळ पुरेशा प्रमाणात त्यांचेकडे नाही. काही जिल्ह्यांत जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी परस्पर समन्वयाने त्यांच्या स्तरावर याबाबत मार्ग काढला आहे. तसेच नांदेड जिल्ह्यातही कंत्राटी कर्मचा-यांचा प्रभावीपणे वापर करण्यात येत असून, त्यांचेद्वारे जिल्हा परिषदेलाही मोठया प्रमाणात मदत केली जात आहे. तथापि, या संदर्भात प्रमाणभूत मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या नसून प्रत्येक जिल्हा त्यांच्या पध्दतीने याबाबत कार्यवाही करीत आहे.



एच बी - २८३८ - १